सामान्य् प्रशासन विभाग

अनुकंपा पदभरती २०२५-२६ च्या अनुषंगाने दिनांक २१.०९.२०२६ रोजी प्रकाशित केलेल्या अनुकंपा पात्र /अपात्र तात्पुरत्या यादीवर उमेदवारांचे/इतर व्यक्तीचे दिनांक ०५.१०.२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत प्राप्त झालेले आक्षेप व विनंती अर्ज विवरण

अ .क्र.	अनुकंपा उमेदवाराचे नाव	पत्र प्राप्त दिनांक	घेतलेले आक्षेप/ केलेली विनंती	कार्यालयाचा अभिप्राय	शेरा
१	श्री. वैभव रामकृष्ण चौरागडे	२२.०९.२०२६	पात्र उमेदवारांच्या प्रतिक्षा यादी मध्ये समावेश करावा संपूर्ण हलफनामे जोडले आहे.माझी शैक्षणिक पात्रता B.Tech in Computer Engineering आहे माझी शैक्षणिक पात्रता वाढविण्यात यावी.	संबंधित उमेदवाराचे नाव अपात्र यादीत ७४ व्या क्रमांक वर असून संबंधिताचे हलफनामे प्राप्त आहेत. हलफनामे प्राप्तीच्या दिनांकास पात्र यादीत नाव समाविष्ट करण्यात येईल.	मान्य
२	श्री.अविनाश सुकितराम जामकाटे	२३.०९.२०२६	अनुकंपा यादीतील सेवाजेष्ठता क्रं.बदली बाबत श्री.अविनाश सुकितराम जामकाटे मृत वडील श्री सुकितराम जामकाटे स.शि.कलकसा, पं.स. देवरी हे हे दिनांक ११.०८.२०१९ ला मृत पावले त्यांच्या वारसदार असुन अनुकंपा तत्वावर नोकरी करिता दिनांक १९.०९.२०१९ ला अर्ज पं.स.देवरी ला केले होते.तरिपण पात्र यादी मध्ये वगळण्यात आले. मा.मु.का.अ.यांचेकडे अर्ज केल्यामुळे सुणावणी घेऊन संबंधीतास पात्र करण्यात आले.सन २०२४-२५ च्या यादी मध्ये माझे नाव अ.क्र.१४ व्या क्र. वर	सदर उमेदवार यांनी प्रस्ताव सादर करते वेळी समंती पत्र नाही म्हणुन त्यांचे नाव नंतर घेण्यात आले होते.परंतु त्यानी गट शिक्षण अधिकारी देवरी यांचेकडे सादर केलेले पत्र व देवरी गशिअ यांनी साप्रवि ला सादर केलेले पत्र तपासूण व खात्री करुन यादीमध्ये सुधारणा करण्यात येवून मा. मुकाअ यांचे टिपणीनुसार २०२४-२५ च्या यादीत १४ व्या क्र. वर नाव घेण्यात आले. परंतु चूकीने संबंधिताचे नाव ४३ व्या क्र.वर घेतले गेले	मान्य

			होते. २०२५-२६ च्या तात्पुरत्या यादीत माझे नाव ४३ व्या क्र. वर दाखविण्यात येत आहे.मला सेवाजेष्ठाता यादी मध्ये वरच्या क्रमांकावर घेण्यात यावे.	आहे. सबब सदर दुरुस्ती करण्यात येवून संबंधिताचे नाव २०२४-२५ च्या यादीनुसार वरच्या क्रमांकावर घेण्यात येईल.	
३	श्रीमती दिक्षा मंगेश मोहतूरे	०७.१०.२०२६	अनुकंपा ज्येष्ठता अपात्र यादीत माझे नाव ६३ क्र. वर आहे. वारसान प्रमाणपत्र व संपूर्ण हलफनामे जोडण्यात आले नाही. याकारणे अपात्र करण्यात आले आहे. संपूर्ण हलफनामे सादर केले आहेत तसेच इतर शैक्षणिक दस्तावेज सोबत जोडले आहेत. करीता मला पात्र यादीत समाविष्ट करण्यात यावे.	ज्या दिनांकास हलफनामे प्राप्त आहेत. त्या दिनांकास संबंधिताचे नाव पात्र यादीत घेण्यात येईल.	मान्य
४	श्रीमती मानसी नितिन गोस्वामी	१८.०९.२०२६	अनुकंपा ज्येष्ठता अपात्र यादीत माझे नाव आहे. संपूर्ण हलफनामे जोडण्यात आले नाही याकारणे अपात्र करण्यात आले आहे. संपूर्ण हलफनामे सादर केले आहेत. करीता माझे नाव पात्र यादीत घ्यावे.	संबंधित उमेदवाराने गट-ड चा विकल्प दिला आहे. तसेच संपूर्ण हलफनामे सादर केले आहे. संबंधिताचे नाव पात्र यादीत घेण्यात येईल.	मान्य
५	कु.शुभांगी मधुकर सुरजुसे (शुभांगी पंकज सोनोने)	०७.१०.२०२६	अनुकंपा ज्येष्ठता अपात्र यादीत माझे नाव आहे. वारसान प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे अपात्र यादीत नाव आहे. वारसान प्रमाणपत्र सादरकेले आहे. पात्र यादीत नाव समाविष्ट करावे.	संबंधित उमेदवाराने गट-ड चा विकल्प दिला आहे. तसेच संपूर्ण हलफनामे सादर केले आहे. संबंधिताचे नाव पात्र यादीत घेण्यात येईल.	मान्य
६	श्रीमती निर्मला छबीलाल भूमके	२४.०९.२०२६	अनुकंपा पात्र यादीत माझे नाव ४९ व्या क्रमांकावर आहे. माझ्या मुलाचे नाव अपात्र यादीत ७९ क्र. वर आहे. माझे नाव वगळण्यात यावे व माझ्या मुलाचे नाव यादीत ठेवावे ही विनंती.	श्रीमती निर्मला छबीलाल भूमके यांनी आपल्या मुलाचे नामांकन केले आहे. श्रीमती निर्मला भूमके यांचे नाव पात्र यादीतून वगळण्यात येईल मुलगा दिव्यांश छबीलाल भूमके यांचे नाव अज्ञान असल्यामुळे अपात्र यादीत ठेवण्यात येईल.	मान्य

७	प्राजित ओमकार रहांगडाले	२५.०९.२०२६	माझे नाव प्रजित ऐवजी प्राजित ओमकार रहांगडाले असे बदल करण्यात यावे. माझी शैक्षणिक पात्रता वाढविण्यात यावी.	सदर ची दुरुस्ती करण्यात येईल.	मान्य
८	सुमित भुषणकुमार पटले	२४.०९.२०२६	माझे नाव अनुकंपा पात्रता यादीत क्र.०४ वर असुन माझी शैक्षणिक पात्रता बी.एड. व मराठी व इंग्रजी टायपिंग ची नोंद करण्यात यावी.	नोंद घेण्यात येईल.	मान्य
९	प्राची रमेशकुमार चोभरे	२५.०९.२०२६	माझे नाव अनुकंपा पात्रता यादीत क्र.१५ वर असुन माझी शैक्षणिक पात्रता construction supervisor १ yr diploma व मराठी व इंग्रजी टायपिंग ची नोंद करण्यात यावी. तसेच माझा प्रवर्ग गोवारी (अ.ज.) नोंद काढण्यात येवून गोवारी (SBC) हा बदल करण्यात यावा. ही विनंती.	संबंधितांनी शैक्षणिक पात्रता construction supervisor १ yr diploma व मराठी व इंग्रजी टायपिंग चे प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच प्रवर्गात बदल करण्याबाबत अर्ज केला असून गोवारी (SBC) चे जातीचे प्रमाणपत्र सादर केले आहे. सबब संबंधिताचे दस्तावेजावरुन दुरुस्ती करण्यात येईल.	मान्य
१०	यश लोकचंद दिहारी	२३.०९.२०२६	माझे नाव अनुकंपा अपात्रता यादीत क्र.३९ वर असुन मला १८ वर्ष पुर्ण झाले असून माझे नाव पात्रता यादीत समाविष्ट करावे. हि विनंती.	संबंधिताचे वय दि.१९.०७.२०२६ रोजी १८ वर्ष पूर्ण झाली आहेत. सबब दस्तावेज तपासणी करुन संबंधिताचे नाव पात्र यादीत घेता येईल.	मान्य
११	साहील देवानंद टेभुर्णे	२८.०९.२०२६	माझे वडील दिवंगत श्री. देवानंद पंढरीजी टेभूर्णे, आरोग्य सहाय्यक पदावर असताना दिनांक ३१.१२.२०२५ रोजी मृत्यू पावले असुन अनुकंपा तत्वावर नोकरी करीता अर्ज दिनांक ३१.०१.२०२६ रोजी तालूका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती सडक/अर्जूनी यांचे कडे केला होता. परंतु माझे नाव सन २०२५-२६ अनुकंपा तात्पुरत्या ज्येष्ठता यादीत	संबंधिताचे प्रस्ताव दिनांक ३१.०८.२०२६ च्या नंतर उशिराने या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यामुळे संबंधिताचे नाव पात्र/अपात्र यादीत समाविष्ट करता आले नाही. परंतु संबंधिताचे प्रस्ताव दिनांक ०४.०२.२०२६ रोजी आरोग्य विभागास प्राप्त झाले आहेत. साप्रविकडे सदर प्रस्ताव दिनांक	मान्य

			दिसून आले नाही. सबब माझे नाव पात्रता यादीत समाविष्ट करावे हि विनंती.	२८.०९.२०२६ रोजी प्राप्त झाले. परंतु सदर प्रस्तावात हलफनामे जोडले नसल्याने संबंधितास याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर दिनांक ३०.०९.२०२६ रोजी संबंधिताने हलफनामे सादर केले आहेत. त्यानुसार दिनांक ३०.०९.२०२६ ला नाव यादीत समाविष्ट करण्यात येईल.	
१२	हेमंत भगवान मेश्राम	९.१०.२०२६	अनुकंपा ज्येष्ठता अपात्र यादीत माझे नाव आहे. संपूर्ण हलफनामे जोडण्यात आले नाही याकारणे अपात्र करण्यात आले आहे. संपूर्ण हलफनामे सादर केले आहेत. करीता माझे नाव पात्र यादीत घ्यावे.	हलफनामे सादर केल्याच्या दिनांकास नाव पात्रता यादीत नाव समाविष्ट करण्यात येईल.	मान्य
१३	विपुल तुळशीराम नरेटी	०५.१०.२०२६	माझे नाव अनुकंपा पात्रता यादीत क्र.४० वर असुन माझी जन्म तारीख २७.०३.२००१ ही असून नाते मुलगी ऐवजी मुलगा यात सुधारणा करण्यात यावी हि विनंती.	सदरची दुरुस्ती करण्यात येईल.	मान्य
१४	प्राची रमेश शेंडे	५.१०.२०२६	माझे वडील सचिन रमेश शेंडे, वरिष्ठ सहाय्यक श.जा. ति. हाय. गोरेगांव येथ कार्यरत होते. दिनांक ०३.०२.२०२६ रोजी मरण पावले असून मी दिनांक ०२.०४.२०२६ रोजी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी यासाठी अर्ज केला होता. परंतु माझे नाव सन २०२५-२६ अनुकंपा तात्पुरत्या ज्येष्ठता यादीत दिसून आले नाही. सबब माझे नाव पात्रता यादीत	संबंधिताचे प्रस्ताव ऑनलाइन प्राप्त होते. ऑफलाईन प्रस्ताव अप्राप्त असल्याने नोंद घेण्यात आली नाही. पात्र यादीत संबंधिताचे नाव समाविष्ट करण्यात येईल.	मान्य

			समाविष्ट करावे हि विनंती.		
१५	श्रीमती ज्योती हेमंतकुमार चौधरी	०५.१०२०२६	माझे मुलीचे नाव कु. आर्या हेमंतकुमार चौधरी यांचे नाव अनुकंपा तात्पुरती यादी मध्ये क्र. वर असून त्याऐवजी माझ्या दुसऱ्या मुलीचे नाव कु. कुनिका हेमंतकुमार चौधरी हिचे नावचा समावेश करावा हि विनंती.	संबंधिताचे अर्ज दिनांक ०५.१०.२०२६ नुसार नाव बदलण्याबाबत अर्ज सादर केला असून सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय अकंपा-१२२५/प्र.क्र. १२१/म.लो.आ. दिनांक १७.०७.२०२५ मधील मुद्दा क्र. ७ (ब) (३) (५) नुसार कु. आर्या हेमंतकुमार चौधरी ऐवजी कु. कुनिका हेमंतकुमार चौधरी हिचे नावाचा समावेश करण्यात येईल.	मान्य

Digitally signed by Farendra Rupchand Kutirkar Date: 27-10-2026 10:36:45	Digitally signed by Donthula Zenith Chandra Date: 28-10-2026 11:08:50
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि) जिल्हा परिषद गोंदिया ***Signed on E-Office***	मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया ***Signed on E-Office***